विषय : मराठी लेखन कौशल्ये

वर्ग: एफ.वाय.बी.ए

प्रा.डॉ.महादेव कांबळे

# प्रस्तावना

भाषिक कौशल्यांमध्ये श्रवण, वाचन, लेखन, संभाषण व भाषण कौशल्ये यांचा समावेश होतो. लहान मुलाला आपल्या घरात कुटुंबामधून श्रवण आणि प्राथमिक पातळीवरील संभाषण कौशल्य प्राप्त होते. मूल शाळेत जाऊ लागते तसे वाचन व लेखन ही कौशल्ये त्याला शिकविली जातात.

शाळेत मुलाला भाषेच्या वर्णमालेची ओळख करून दिली जाते. ही वर्णमाला त्याच्याकडून सतत लिहून त्याच्या परिचयाची करून दिली जाते. येथे मुलाच्या प्राथमिक लेखन कौशल्याला सुरुवात होते. सतत लिहिल्यामुळे मुलाला वर्णांचे ज्ञान होते आणि तो हळूहळू वाचन करू लागतो. त्याचे वाचन कौशल्य सुरू होते. यारितीने लेखन कौशल्य हे वाचन कौशल्यासाठी पूरक ठरते. पुढे मुलाला लेखन कौशल्यात गती येते आणि तो विविध मजकूर, स्वतःचे विचार,भावना यांतून लेखन करू लागतो

**लेखनाचे महत्त्व :**

आपल्याकडे सुरुवातीच्या काळात पठण आणि प्रत्यक्ष व्यवहार यातून पुढच्या पिढीला ज्ञान संक्रमित केले जाई. पण हळूहळू त्याच्या मर्यादा लोकांच्या लक्षात येऊ लागल्या. त्यामुळे विद्वान लोकांकडून मिळणारे हे ज्ञान शुद्ध आणि मूळ स्वरूपात जतन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातून ज्या-त्या भाषेसाठी वर्ण आणि लिपी तयार करण्यात आली आणि लेखनाला सुरुवात झाली.

कुठलाही मजकूर लिखित स्वरूपात दीर्घकाळ जतन करता येतो. 'ज्ञानेश्वरी', 'लीळाचरित्र', 'गुरूचरित्र' यांसारखे बाराव्या - तेराव्या शतकात लिहिले गेलेले ग्रंथ त्यांच्या लिखित स्वरूपामुळे आजही उपलब्ध आहेत. सातव्या शतकापासूनच्या ताम्रपट, शिलालेख यांच्यातून आपल्याला त्या काळातील मराठी भाषा, तिची निर्मिती, प्राथमिक स्वरूप, लोकव्यवहार, लोकसंस्कृती यांचे ज्ञान होते. आजचा विचार केला तर सर्व कार्यालयीन व्यवहार हे लिखित स्वरूपात असतात. आजचे युग संगणक युग असले तरी हे लिखित स्वरूप माहितीच्या संकलनासाठी आवश्यकच ठरले आहे. एखादी गोष्ट तोंडी सांगण्याऐवजी लिहून कळविल्यास त्यात नेमकेपणा येतो व त्याला विश्वासाहर्ता प्राप्त होते.

## लेखन कौशल्याचे स्वरूप :

आपल्या मनातील विचार इतरांना सहज समजतील अशा तऱ्हेने योग्य शब्दात, योग्य क्रमाने लिहिणे म्हणजे 'लेखन कौशल्य' होय. सुवाच्य, वळणदार हस्ताक्षर, प्रमाणलेखन, विरामचिन्हांचा योग्य वापर आणि लेखन गती ही लेखनाची प्राथमिक कौशल्ये आहेत. आपले हस्ताक्षर वाचता येईल असे सुट्टे- सरळ आणि एकसारखे असावे. शब्द, वाक्य, परिच्छेद यांच्यात पुरेसे अंतर असावे. कागदावर पुरेसा समास सोडलेला असावा. लेखनाला गती येण्यासाठी लेखनाचा सराव ठेवावा. ज्या विषयाचे लेखन करायचे आहे त्या विषयाची पूर्वतयारी व आराखडा तयार असेल तर लेखनाला गती येते. परिणामकारक लेखनासाठी विचारांची सुसंगत व तर्कशुद्ध मांडणी असावी. मुद्दे स्पष्ट असावेत. भाषाशैली बोजड नसावी. लेखनातून आपण वाचकांशी संवाद साधत आहोत हे भान असावे. असे परिणामकारक लेखन तंत्र अवगत होण्यासाठी वाचन, श्रवण व चिंतन आवश्यक ठरते. आजच्या उद्योग व्यवसायात 'श्रुतलेखन' महत्त्वाचे ठरू लागले आहे. "दुसऱ्याचे बोलणे ऐकून ते जसेच्या तसे त्याच्या आज्ञेबर हुकुम लिहिणे म्हणजे श्रुतलेखन" होय. श्रुतलेखन करताना व्यक्तीच्या बोलण्यातील सत्यता कायम ठेवावी. त्यातून चूकीची भूमिका निर्माण होऊ नये. बोलणाऱ्याचा उत्स्फूर्त भाव टिकून राहावा, याची काळजी घ्यावी.

## लेखनातील अडचणी :

लेखन करताना काही अडचणीही येतात. जसे: लेखन माध्यमातून चटकन संवाद साधता येत नाही. लेखनाकडे कष्ट म्हणून पाहिले तर लेखन होत नाही. लेखन करण्याची मानसिकता नसेल, आत्मविश्वासाचा अभाव आणि न्यूनगंड असेल तर लेखन होऊ शकत नाही. लेखन विषय नीरस व अयोग्य वाटू लागला तर परिपूर्ण लेखन होत नाही. दृष्टिदोष, श्रवणदोष, लेखन तंत्र अवगत नसणे, वातावरण, जागा यांमुळे लेखनात अडचण येते. व्यवस्थित लेखन साहित्य उपलब्ध नसणे, वातावरण पूरक नसणे वा लेखनासाठी जागा व्यवस्थित नसेल तर लेखनात काही अडचणी येतात.

## लेखन कौशल्य उपाय :

सर्वप्रथम लेखन तंत्र अवगत करणे महत्त्वाचे ठरते. हस्ताक्षर सुव्यवस्थित असण्याचा कटाक्ष ठेवावा. तिरपे अक्षर, जोडून अक्षर काढणे टाळावे. शब्दांवर शिरोरेघ असल्यास लेखनाला विशिष्ट सौंदर्य व देखणेपण प्राप्त होते. लेखन सूत्रबद्ध असावे. त्यामध्ये निश्चित मांडणी असावी. विशिष्टाकडून सामान्याकडे अशा स्वरूपाची मांडणी सामान्यपणे योजली जाते.

आपला भाषिक शब्दसंग्रह विपुल असेल तर लेखन करताना योग्य शब्द, निवेदन पद्धती, वाक्यरचना करणे सोपे जाते. त्याबरोबर शुद्धलेखन, परिच्छेद, शीर्षक, उपशीर्षक यांसारख्या घटकांकडेदेखील लेखकाने लक्ष द्यावे. लेखनामध्ये आपण कशा प्रकारची भाषा वापरतो याला विशेष महत्त्व आहे.

लेखनाचे लक्ष्य निश्चित करून त्यानुसार आराखडा तयार करावा. लेखनासाठी घेतलेला विषय सविस्तर स्पष्ट करता आला पाहिजे. लेखनात कल्पकता व नियोजन असेल तर लेखन अधिक प्रभावी होते.

मनाची एकाग्रता असेल तर लेखन चांगले होते. त्यासाठी लेखन साहित्य सुस्थितीत असणे, भोवतालच्या वातावरणाशी, जागेशी मिळते- जुळते घेणे, लेखन करताना कोणाशी वाद न घालणे असा सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. या बाह्य वातावरणाबरोबरच मनाची एकाग्रता संपादन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा. ही पथ्ये सांभाळली तर प्रभावी लेखन तंत्र अवगत होते जी आजच्या काळाची एक महत्त्वाची भाषिक गरज आहे.